RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ४, अंक ८०(२)] शनिवार, जून ३०, २०१८/आषाढ ९, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १३४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०१८

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक कृषिआ-१६१३/प्र.क्र. १९१/१६-ए.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या कृषि आयुक्तालयामधील " कृषि सहायक " (गट-क) (सेवाप्रवेश) नियम, २०१८ मध्ये पुढील सुधारणा करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ—**

(एक) या नियमांना, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या कृषि आयुक्तालयामधील कृषि सहायक (गट-क) (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१८, असे म्हणावे.

(दोन) हे नियम दिनांक २९ जानेवारी २०१८ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल.

२. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या कृषि आयुक्तालयामधील कृषि सहायक (गट-क) (सेवाप्रवेश) नियम, २०१८ (यात यानंतर ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) या नियमातील नियम २ मधील पोट-नियम (१) मधील खंड (घ) नंतर पुढील खंड दाखल करण्यात येत आहे :—

" (घ-१) " कृषि पदवी " याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कृषि, कृषि अभियांत्रिकी किंवा कृषि वानिकी (फलोत्पादन) विषयातील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली कोणतीही अर्हता, असा आहे ;

३. मुख्य नियमातील नियम ३ मधील खंड (ख) च्या पोट-नियम (दोन) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :—

" जिने कृषि विषयामधील किमान पदविका धारण केलेली आहे किंवा कृषि पदवी किंवा कृषि विषयातील यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या, ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**विजय कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 30th June 2018

*NOTIFICATION*

**CONSTITUTION OF INDIA.**

No.Krushiaa-1613/C.R. 191/16-A.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules to amend the Agriculture Assistant in Group ' C ' in the Commissionerate of Agriculture under the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department (Recruitment) Rules, 2018, namely :—

1. *Short Title and Commencement* :—

(1) These rules may be called the Agriculture Assistant in Group ' C ' in the Commissionerate of Agriculture under the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department (Recruitment) (Amendment) Rules, 2018.

(2) These rules shall be deemed to have come into force with effect from the 29th January 2018.

2. In rule 2 of the Agriculture Assistant in Group ' C ' in the Commissionerate of Agriculture under the Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department (Recruitment) Rules, 2018 (hereinafter referred to as " the principal Rules "), in sub-rule (*1*), after clause (*d*) the following clause shall be inserted, namely :—

(d-1) " Degree " means an Agriculture, Agriculture Engineering or Agriculture Vaniki (Horticulture) Degree of a Statutory University or any other qualification declared by the Government to be equivalent thereto.

3. In Rule 3 of the Principal Rules, in clause (*b*), for sub-clause (*ii*) the following sub-clause shall be substituted, namely :—

" (ii) Possess minimum Agriculture Diploma or Degree in Agriculture or any other higher educational qualification in Agriculture, ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**BIJAY KUMAR,**

Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.